# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 December 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १८ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- संविधान हा वंचित घटकांचं कल्याण आणि राष्ट्रनिर्माणासाठीचा प्रेरणास्रोत- राज्यसभेत संविधानावरील विशेष चर्चेच्या उत्तरात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- एक देश एक निवडणूक संदर्भातली दोन विधेयकं लोकसभेत सादर-विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची विरोधकांची मागणी
- परभणी आणि बीड प्रकरणी विधानसभेत आज नियम १०१ अन्वये चर्चा- अध्यक्षांची घोषणा
- विधान परिषदेच्या सभापती पदासाठी उद्या निवडणूक-महायुतीकडून राम शिंदे यांना उमेदवारी

आणि

- राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या रिया थत्तेला सुवर्णपदक

****

संविधान हा फक्त एक दस्तावेज नाही, तर वंचित घटकांचं कल्याण आणि राष्ट्रनिर्माणासाठीचा प्रेरणास्रोत असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. संविधान स्वीकृतीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यसभेत झालेल्या चर्चेला ते उत्तर देत होते. संविधान हा दाखवण्याचा नव्हे तर अंगीकार करण्याचा विषय असल्याचं शहा यांनी नमूद केलं. दरम्यान, या विधेयकावर काल सकाळपासून सुरू झालेल्या चर्चेत सभागृह नेते, केंद्रीय मंत्री जे पी नड्डा, माजी पंतप्रधान एच डी देवेगौडा, काँग्रेसचे सय्यद नासीर हुसैन, राष्ट्रीय जनता दलाचे

मनोज झा, बीजू जनता दलाचे निरंजन बिशी आदी मान्यवरांनी सहभाग घेत, आपली मतं मांडली.

****

एक देश एक निवडणूक संदर्भातली दोन विधेयकं काल लोकसभेत मांडण्यात आली. संविधान दुरुस्ती विधेयक २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक २०२४ सभागृहात सादर करण्याचा प्रस्ताव केंद्रीय कायदे मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी मांडला. ही विधेयकं सदनाच्या पटलावर मांडण्यासाठी मत विभाजनाची मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी केली. त्यानुसार घेण्यात आलेल्या मतदानात २६९ सदस्यांनी विधेयकं मांडण्याच्या बाजूने तर १९८ सदस्यांनी त्या विरोधात मतदान केलं. त्यानंतरही विरोधकांनी ही विधेयक म्हणजे संविधानाच्या मूलभूत रचनेवर हल्ला असल्याची टीका करत, ही विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची मागणी केली. अर्जुन राम मेघवाल यांनी विरोधकांचा हा आरोप खोडून काढत विधेयक संयुक्त संसदीय समितीसमोर आणण्याची तयारी दर्शवली आहे.

दरम्यान, एक देश एक निवडणूक या संकल्पनेबाबत अधिक माहिती देणारा हा विशेष वृत्तांत,

***‘‘जगातली प्रमुख लोकशाही राजवट असलेल्या भारतात स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत चारशेपेक्षा अधिक निवडणुका झाल्या आहेत. १९५१ ते १९६७ या काळात लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकत्रित झाल्या होत्या. त्यानंतर मात्र देशभरात सातत्यानं सुरु असलेल्या वेगवेगळ्या निवडणुकांमुळे ‘एक देश एक निवडणूक’ हा विषय समोर आला. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकत्रित घेण्याची शिफारस या विधेयकात आहे. हा निर्णय झाल्यास, निवडणुका कालबद्ध मर्यादेत होणं आणि निवडणूक खर्च कमी होण्यासोबतच, नियमित कामकाजातला अडथळाही यामुळे दूर होणार आहे.***

***या मुद्याचा अभ्यास करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समितीला साडे २१ हजारांहून अधिक प्रतिक्रिया प्राप्त झाल्या. यात ८० टक्क्यांपेक्षाही अधिक नागरिकांनी निवडणुका एकत्रित घेण्याच्या बाजूनं कौल दिला. ४७ राजकीय***

***पक्षांनीही आपलं मत नोंदवलं. त्यानंतर या समितीने सादर केलेला अहवाल १८ सप्टेंबर रोजी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकृत करण्यात आला.''***

****

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी काल नवी दिल्लीत शेतकऱ्यांचा किटकनाशकांपासून बचावासाठी किसान कवच सूट चं लोकार्पण केलं. किटकनाशकांमुळे श्वसनाच्या त्रासासह त्वचेचे विकार तसंच डोळ्यांना इजा होण्याचा धोका असतो, किसान कचव सूट यावर योग्य उपाय असल्याचं जितेंद्र सिंह म्हणाले. काही शेतकऱ्यांना या सूट चं काल वाटप करण्यात आलं.

****

परभणी आणि बीड प्रकरणी आज विधानसभेत नियम १०१ अन्वये चर्चा घेण्यात येणार आहे. काँग्रेस पक्षाचे नितीन राऊत यांनी काल सदनाचं कामकाज सुरू होताच, यासंदर्भातला स्थगन प्रस्ताव मांडला, त्याला नाना पटोले यांनी अनुमोदन दिलं. हा विषय गंभीर असून, त्यावर आज नियम १०१ अन्वये चर्चा घेण्याचं अध्यक्षांनी जाहीर केलं. बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही आरोपीला अजूनही अटक झाली नसल्यावरुन टीका केली. केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी यासंदर्भात बोलताना, सगळ्या सात आरोपींना पकडून फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली.

या विषयावर सरकार गंभीर नसल्याचा आरोप करत विरोधकांनी सभात्याग केला.

दरम्यान, या दोन्ही घटनांच्या निषेधार्थ काल बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीनं आंदोलन करण्यात आलं.

****

महाराष्ट्र मुद्रांक कायदा १९५८ मध्ये सुधारणा करणारं विधेयक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत मांडलं. प्रतिज्ञापत्र, करार तसंच संबंधित कागदपत्रांवर सध्या लागणारं शंभर रुपयांचं मुद्रांक शुल्क शंभर रुपयांवरून पाचशे रूपये करण्याची तरतूद या विधेयकात आहे. याबाबतचा अध्यादेश सरकारनं चौदा ऑक्टोबरला काढला होता.

दरम्यान, शालेय तसंच महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांसाठी पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरची अट शिथिल करून शंभर रुपयांचं स्टॅम्प पेपर लागू करावा अशी मागणी विधान परिषदेत सदस्य सुनिल शिंदे यांनी केली.

****

विधान परिषदेच्या सभापती पदाची निवडणूक उद्या १९ डिसेंबरला होणार आहे. उपसभापती निलम गोऱ्हे यांनी काल ही घोषणा केली. यासाठी आज दुपारी बारा वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. महायुतीने प्राध्यापक राम शिंदे यांना उमेदवारी दिली असून, ते आज सकाळी अर्ज दाखल करणार आहेत.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २५ जानेवारी पासून पुन्हा उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. जालना जिल्ह्यातल्या आंतरवाली सराटी इथं ते काल वार्ताहरांशी बोलत होते. सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यावं, गॅजेटची अंमलबजावणी करावी, सगे सोयऱ्याची अंमलबजावणी करावी, आदी मागण्यांचा त्यांनी पुनरुच्चार केला.

****

महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अंतर्गत धाराशिव तालुक्यात गोवर्धनवाडी इथं भाग्योदय ग्राम संघ महिला बचत गटाच्या माध्यमातून लिंगभेद समानतेविषयी व्यापक जनजागृती केली जात आहे. याबाबत धाराशिव तालुका लिंग समानता अभियान कक्षाचे तालुका व्यवस्थापक तेजस कुलकर्णी यांनी माहिती दिली....

> ***‘‘धाराशिव तालुका आणि जिल्ह्यामध्ये नयी चेतना पहल तीन हा कार्यक्रम आम्ही यशस्वीरित्या राबवत आहोत, याच्यासाठी आम्ही जनसंसाधन केंद्रांतर्गत जीपीपींची निवड केली आहे. जीपीपींच्या माध्यमातून प्रत्येक गटामध्ये आम्ही ज्या काही महिला विषयक लिंग भेदभाव होतात, त्याविषयी आम्ही जनजागृती या अभियानाच्या माध्यमातून करत आहोत. याच्यासाठी आम्ही लिंग भेदभाव करणार नाही, याची शपथ प्रत्येक महिलेला देत आहोत. त्याचबरोबर गावोगावी प्रभातफेऱ्या काढत आहोत. बालविवाह बंद होण्यासाठी आम्ही शपथ देत आहोत.’’***

****

राज्य शासनाची पिंक रिक्षा योजना महिलांसाठी उपयुक्त असून, महिलांनी याबाबत जाणून घेण्याचं आवाहन छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा महिला बालविकास अधिकारी रेशमा चिमंद्रे यांनी केलं आहे. आकाशवाणीला यासंदर्भात दिलेल्या मुलाखतीतून त्यांनी हे आवाहन केलं. त्या म्हणाल्या...

***“या योजनेचा उद्देश असा आहे की, राज्यातील महिला आणि मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे. त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करणे, तसेच महिला सशक्तीकरणासाठी चालना देणे. महिला आणि मुलींना सुरक्षित प्रवास करता यावा, यासाठी ही महत्वाकांक्षी योजना राज्य शासनाने सुरू केलेली आहे.”***

रेशमा चिमंद्रे यांची ही संपूर्ण मुलाखत आज सकाळी दहा वाजून ४५ मिनिटांनी आमच्या केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या प्रासंगिक या कार्यक्रमात ऐकता येईल.

****

नवी दिल्ली इथं झालेल्या महिलांच्या २५ मीटर पिस्टल राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या रिया थत्ते हिनं सुवर्ण पदक पटकावलं आहे. अंतिम फेरीत रियाने पंजाबच्या सिमरनप्रीत कौर ब्रार हिचा सात – दोन असा पराभव केला.

****

बॉर्डर – गावस्कर चषक मालिकेत ब्रिस्बेन कसोटी अनिर्णित राहण्याची शक्यता आहे, सामन्याच्या आजच्या पाचव्या दिवशी भारताचा पहिला डाव २६० धावांवर संपुष्टात आला. काल या सामन्यात फॉलोऑन टाळण्यात भारताला यश आलं. मात्र भारत पहिल्या डावात अजूनही १८५ धावांनी पिछाडीवर आहे. पावसामुळे सध्या खेळ थांबला आहे.

****

महिला क्रिकेटमध्ये, काल नवी मुंबईत झालेल्या दुसऱ्या टी – ट्वेंटी सामन्यात वेस्ट इंडिजने भारताचा नऊ खेळाडू राखून पराभव केला. तीन सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत असून, मालिकेतला तिसरा सामना आज होणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या माळेगाव यात्रेला येत्या २९ डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. या यात्रेची तयारी पूर्ण झाली असून, यात्रा प्लास्टिक मुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी सांगितलं. या यात्रेच्या तयारीबाबत कालच्या आढावा बैठकीनंतर त्या वार्ताहरांशी बोलत होत्या.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचं आवाहन नांदेड जिल्ह्याचे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता तथा पाणी पट्टी कर वसुली मोहिम राबवली जात आहे. हर्सुल परिसरातल्या ४३ लाख ३० हजार ४८ रूपये थकवणाऱ्या मंगल कार्यालयाला काल वसुली पथकाच्या अधिकारी यांनी टाळे ठोकून कारवाई केली.

****

मध्यप्रदेशात देवास इथल्या अमलताश अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरदचंद्र वानखेडे यांच्या पत्नी डॉ शामला वानखेडे यांचं छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, त्या ६९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले.

****